# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 13/2023 दिनांक : 09.01.2023

## 1)घरफोडी :—

**1)हदगांव :—** दिनांक 07.01.2023 रोजी चे 20.00 ते दि. 08.01.2023 चे 10.00 वा. चे दरम्यान, **मौ. वाळकी फाटा शिवार ता. हदगांव जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादीचे जय केदारनाथ जिनिंग अँण्ड प्रेसिंग कंपणीचे शटरचे कुलूप तोडुन आत प्रवेश करून जिनींग व प्रेसिंग मधील 70,000/—रूपयाचे साहित्य कोणीतरी अज्ञात आरोपीतांनी चोरून नेले. वगैरे **फिर्यादी भास्कर पि. सुभाषराव वानखेडे, वय 31 वर्षे, व्यवसाय शेती व व्यापार रा. ल्याहारी ह. मु. देशमुख गल्ली हदगाव ता. हदगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगांव** गुरन 08/2023 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गायकवाड, मो.क्रं. 7758864052** हे करीत आहेत.

## 2)जनावर चोरी :—

**भोकर :—**दिनांक 08.01.2023 रोजी चे 08.00 ते 11.00 चे दरम्यान, **फिर्यादीचे मेहुण्याच्या शेतातुन मौ. मोखांडी शिवार ता. भोकर जि. नांदेड येथे**, यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचा मेव्हणा भगवान शिवलाल राठोड रा. मोखांडी ता. भोकर यांचे शेतातील बांधुन ठेवलेले दोन गाई व गोरा असे एकुण तीन जनावरे किंमती अंदाजे 1,10,000/—रूपयाचे चोरून नेले. **फिर्यादी विजेश तुकाराम पवार, वय 50 वर्षे, व्यवसाय शेती रा. अमराबाद तांडा ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 10/2023 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2565 आर आर जंकुट**, मो. क्र. **9970993858** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :—

**1)देगलुर :— 16.07..2020** रोजी चे 10.00 दि. 29.08.2021 चे 16.00 वा. चे दरम्यान, **मौ. हिपरगा थडी ता. देगलुर आणि मंडल मदनुर जि. कामारेड्डी येथे**, यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस तु दिसायला काळी आहेस, तुझे माहेरहुन सेंट्रींगचे साहित्य घेण्यासाठी एक लाख रूपये घेऊन ये असे म्हणुन शिवीगाळ करून थापडबुक्याने मारहाण केली व शारिरीक व माणसीक छळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 25 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 13/2023 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2822 कणकवळे, मो.क्रं. 9821159844** हे करीत आहेत.

## 4)फसवणुक :—

**देगलुर :—** दिनांक 14.12.2020 वर्षी, **देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे**, यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून खोटे बनावटी वाटणीपत्र तयार करून त्या वाटणी पत्रावर फिर्यादीच्या वडीलांची खोटी बनावट सही केली व स्वताची सही करून सदर दस्त खोटे व बनावटी असल्याचे माहिती असतांना देखील या आरोपीने सदर दस्तऐवज खरे आहे अशी खोटी माहीती न्यायालयात देवुन न्यायालयाची दिशाभुल करून फिर्यादीच्या जमीनीचा तो मालक आहे असे उदेशीत करून घेण्याचा दावा व शपथपत्र सादर केले आहे. वगैरे वरून मा. कोर्टाचे आदेशावरून 156(3) सीआरपीसी प्रमाणे गुन्हा दाखल आहे. **फिर्यादी अनिता पि. विश्वनाथ घोडेकर, वय 32 वर्षे, व्यवसाय शेती व नौकरी रा. शिळवणी ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरन 14/2023 कलम 420, 464, 467, 468, 471, 177, 193, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोउपनि/सुर्यवंशी मॅडम, मो.नं. 9821159844** हे करीत आहेत.

## 5)अपघात :—

**1)भोकर :—** दिनांक 19.12.2022 रोजी चे 11.30 वा. चे सुमारास, **भोकर ते नांदेड रोडवर चिदगीरी पाटी जवळ ता. भोकर जि. नांदेड येथे**, यातील **मयत नामे विजय दत्ता पवार, वय 17 वर्षे, रा. चिखलवाडी ता. भोकर** हा व फिर्यादी व त्याचा मित्र असे तिघे मिळुन साईनाथची होंडा ॲक्टीव्हा क्रमांक एमएच—26/सीए—1012 वर ट्रिपल सीट बसुन भोकरहुन नांदेडकडे जात असतांना त्यांच्या समोरून नांदेड रोडने येणारे वाहन क्रंमाक एमएच—26/बीई—8032 हायवा टिपरचे चालकाने त्याच्या ताब्यातील टिप्पर हे हयगई व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन चिदगीरी फाटयाजवळ वळविल्याने समोरून धडक बसुन यातील मयताचे मरणास कारणीभुत झाला व साक्षीदार लोकांना जखमी केले. वगैरे **फिर्यादी गणेश गंगाधर दांगट, वय 17 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. चिखलवाडी भोकर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं. 11/2023 कलम 279, 337, 304(अ), भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कांबळे, मो.क्र. 9923413244** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड